# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नाशिकमधील जुन्या गावठाणांचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(१) १०३३ (२३-१२-२०१४). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकमधील जुन्या गावठाणांचा मुंबईच्या धर्तीवर पुनर्विकास करण्याकरिता क्लस्टर डेव्हलपमेंट योजना राबविण्याची दि. २४ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) खरे आहे.

(२) नाशिक शहरासाठीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर झाली असून त्यासोबत नाशिक शहरासाठीची प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीही सादर करण्यात आली आहे. सदरहू नियमावलीमध्ये “क्लस्टर डेव्हलपमेंट योजने” बाबतची तरतुद करण्यात आलेली आहे. उक्त अधिनियमानुसार मंजूरीसाठी विहित केलेल्या कालमर्यादेत प्रारुप विकास योजनेस प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावलीसह मंजूरी देण्याची कार्यवाही करणेत येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांची बेकायदेशीर होत असलेली खरेदी विक्री**

**(२) १३४३५ (०८-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडातील अधिकारी/कर्मचाऱ्यांशी संगनमत करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे गिरणी कामगारांची तसेच मयत गिरणी कामगारांची घरे ताब्यात घेतली जात असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०२-२०१६) :**(१) व (२) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत मुंबईतील बंद पडलेल्या १८ गिरण्यांच्या जमिनीपैकी म्हाडाच्या उपलब्ध करुन दिलेल्या जमिनीवर एकूण ६,९२५ सदनिका गिरणी कामगारांकरीता बांधण्यात आलेल्या आहेत. सदर सदनिकांसाठी दि. २८.०६.२०१२ रोजी म्हाडाने सोडत काढली होती व त्या सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या ५,३४० पात्र गिरणी कामगारांना सदनिकांचे वाटप करण्यात आलेले आहे व उर्वरित १५८५ सदनिकांच्या वितरणाची कार्यवाही चालू आाहे. शासनाच्या दि. ०३.०८.२०१२ च्या आदेशानुसार गिरणी कामगारांसाठी वितरीत करण्यात आलेली घरे वितरणाच्या दिनांकापासून पुढील १० वर्षे पर्यंत विकता येत नाहीत.

दिनांक ३०.०१.२०१५ रोजी गृहनिर्माण भवन, म्हाडा, मुंबई यांच्या आवारात श्रीमती कंकूबेन परमार श्री. प्रकाश कदम व श्री. दत्ताराम खाडे या व्यक्तीमध्ये घर खरेदी-विक्री वरुन वाद निर्माण झाला होता व त्यानुषंगाने श्रीमती कंकूबेन परमार यांनी म्हाडाच्या दक्षता विभागास श्री.खाडे व श्री. कदम यांच्याकडून फसवणूक झाल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दक्षता विभागाने केलेल्या चौकशीमध्ये त्यांच्यामध्ये गिरणी कामगारांची घरे खरेदी विक्री वरुन वाद झाल्याचे निदर्शनास आले. दक्षता विभागाने संशयित व्यक्ती श्री. कदम यांच्याकडून गिरणी कामगारांच्या घरांच्या वितरणपत्रांच्या ४ प्रती हस्तगत केल्या व संबंधितांविरुध्द खेरवाडी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्याचे निर्देश मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना दिले. त्यानुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खेरवाडी पोलीस ठाणे यांना श्री. कदम यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खेरवाडी पोलीस ठाणे यांनी याबाबत यांच्या दि. १३.०२.२०१५ च्या पत्रान्वये म्हाडास सादर केलेला अहवाल पाहता या प्रकरणी योग्य ती चौकशी संबंधित पोलीस ठाणे यांनी केली नसल्याचे म्हाडाच्या निदर्शनास आल्याने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी पोलीस उपायुक्त झोन ८, वांद्रे (पूर्व) यांना त्यांच्या दि. १४.०५.२०१५ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी फेरतपासणी करण्याबाबत विनंती केली होती. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलिस निरीक्षक, खेरवाडी पोलिस स्टेशन यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि. १३.०८.२०१५ रोजीच्या नविन अहवालानुसार, श्री. हरिश्चंद कदम या खाजगी

व्यक्तीकडेज्या ४ गिरणी कामगारांची प्रथम सूचनापत्राच्या प्रती आढळल्या, त्यापैकी २ गिरणी कामगारांनी (श्रीमती रंजना लक्ष्मण काटकर व श्री. हनुमंत विलास शिंदे) यांनी आपली कोणतीही फसवणूक झालेली नाही असा पोलिस स्टेशनमध्ये जबाब दिला आहे व उर्वरित २ गिरणी कामगारांबाबत, संबंधित पोलिस ठाण्याकडून चौकशी चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहराचा नव्याने प्रारुप आराखडा तयार करण्याबाबत**

**(३) १६६२८ (११-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना कायदा १९६६ नुसार कलम २१ प्रमाणे नाशिक शहराबाबत नव्याने प्रारुप आरखडा तयार करण्याचे काम सुरु केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रारूप विकास आराखडा कधीपर्यंत पुर्ण करण्याचे शासनाने ठरविले आहे, हे खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) व (२) नाशिक शहरासाठीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-३० अन्वये शासनाकडे दिनांक १६.११.२०१५ रोजी मंजूरीस्तव सादर झाली असून उक्त अधिनियमानुसार मंजूरीसाठी विहित केलेल्या कालमर्यादेत त्यास मंजूरी देण्याविषयी निर्णय घेण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरात १०० अग्निशमन केंद्राची आवश्यकता असल्याबाबत**

**(४) १७२३६ (१९-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराष्ट्रीय नियमानुसार दर चार किमीवर एक अग्निशमन केंद्र या प्रमाणे ४३४ किमी आवाका असलेल्या मुंबईसाठी १०० अग्निशमन केंद्राची आवश्यकता असून केवळ ३३ केंद्र असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगीची दुर्घटना घडल्यास अग्निशमन दलाचे जवान आणि गाड्या तीन मिनिटात घटनास्थळी पोहोचतात ही मुंबई अग्निशमन दलाची पूर्वी ख्याती होती परंतु मागील काही वर्षात विकासकामामुळे व लोकवस्ती वाढल्यामुळे, ट्रॅफिक जॅममुळे अग्निशमन गाड्या पोहचण्यास विलंब होत आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे. माहे मे, २०१५ पर्यंत मुंबई अग्निशमन दलाची ३३ अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.

(२) प्रचलित पध्दतीप्रमाणे आगीच्या दुर्घटना घडल्याची सूचना अग्निशमन केंद्रास मिळाल्यानंतर सदर गाड्यात जवान एका मिनिटात अग्निशमन केंद्रातून निघण्याची पध्दत आहे. परंतु अग्निशमन दलाचे वाहन रस्त्यावरुन जाताना वाहतुकीची गर्दी, रस्त्यावर उभी केलेली वाहने व अग्निशमन केंद्रापासून आगीचे ठिकाणी यामधील अंतर या सर्व बाबींवर प्रतिसादाची वेळ अवलंबून असते.

अग्निशमन केंद्राचे प्रमाण ठरविण्यासाठी सर्वसाधारणपणे लोकसंख्या, क्षेत्रफळ प्रतिसादाची वेळ यांचा विचार केला जातो. मुंबईकरिता या सर्व गोष्टीचा विचार करुन सध्या असलेल्या ३४ अग्निशमन केद्रांव्यतिरिक्त २६ अग्निशमन केंद्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहेत. तसेच १० मिली फायर टेंडर बृहन्मुंबईच्या वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त अरुंद गल्ल्या, झोपडपट्टी येथे प्रभावीपणे अग्निशमन कार्य करण्याकरिता १० क्वीक रिस्पॉन्स मल्टीपर्पज व्हेईकल घेण्याचे प्रस्ताविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगांव (पूर्व) मुंबई येथील जूनी म्हाडा कॉलनी येथील जनरल अरुणकुमार वैद्य मार्गावर असलेल्या अनधिकृत शेडबाबत**

**(५) १७४८४ (१०-०८-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (पूर्व) मुंबई येथील जूनी म्हाडा कॉलनी येथील जनरल अरुणकुमार वैद्य मार्गावर असलेल्या एका अनधिकृत शेडमधील स्टुडिओत मध्यरात्री आग लागून स्टुडिओलगत असलेली पंधरा दुकाने जळून खाक झाली यामध्ये वित्तहानी झाली असल्याची बाब दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६)** :(१) गोरेगांव (पूर्व) मुंबई येथील अरुणकुमार वैद्य मार्गावरील सामना परिवार को.ऑ.हौ.सो. जवळ बैठ्या शेडच्या विविध दुकानामध्ये दिनांक १७.०४.२०१५ रोजी ०२.२८ वाजता आग लागली होती. त्या शेडमध्ये स्टुडिओ नव्हता. या आगीची सुरुवात सदर शेडमधील ए १ हॉटेलमधून झाली. सदर आगीत अंदाजे रु. ४,४७,०००/- इतके नुकसान झाले आहे.

(२) मुंबई अग्निशमन दलामार्फत सदर आगीची चौकशीकरण्यात आली असून, सदर घटनेचे कारण सदोष विद्युत प्रणाली असे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड-मालवणी येथील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड (एमएचबी) कॉलनीतील गढूळ पाणी, कचरा, सांडपाणी अशा विविध समस्यांबाबत**

**(६) १७७६२ (११-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड-मालवणी येथील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड (एमएचबी) कॉलनीतील रहिवासी हे गढूळ पाणी, कचरा, सांडपाणी अशा विविध समस्यांनी त्रस्त झाले असल्याचे दिनांक ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका व म्हाडा प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुनही या समस्यांकडे संबंधित अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील रहिवासी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे एमएचबी कॉलनीतील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रहिवाशांच्या विविध समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६)** :(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मालाड-मालवणी येथील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड वसाहत सन १९६६-६८ साली झोपडपट्टी निर्मुलन योजनेअंतर्गत वसवलेली असून, सदर वसाहत म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते.

सदर वसाहतीतील कचरा स्वच्छ प्रबोधन योजनेंतर्गत नियमितपणे गोळा करुन सदर परिसराची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सफाई करण्यात येते. तसेच जमा झालेला कचरा, कचरागाडीमार्फत नियमितपणे उचलण्यात यऊन महापालिकेमार्फत सदर परिसर साफ करण्यात येतो.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत म्हाडा प्राधिकरणाला गढूळ पाण्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने अंतर्गत जलवाहिन्या बदलून घेण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील मालाड येथील मार्वे रोड मिठ चौकी ते खारोडी येथे वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(७) १७७६३ (११-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील मालाड येथील मार्वे रोड हा मिठ चौकी ते खारोडी रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून अनेक वेळा अपघात होतात व मोठ्या प्रमाणावर जीवीत हानीही होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारोडी येथील रस्ता अरूंद असल्याने वाहतूक कोंडी समस्या निर्माण आली असून वाहतूक शाखेने महानगरपालिकेस सदरचा रस्ता रूंद करण्यास माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मार्गावरील वाहतूकीची होत असलेली कोंडी सोडविण्याबाबत व रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. संबंधित मार्वे रस्ता हा वाहतूक व समन्वय यांच्या मंजूरीनुसार ९० फुट रुंदीचा असून प्रस्तुत अरुंद रस्त्याचा भूभाग अग्निशमन केंद्र ते नाझनीन अपार्टमेंट यामध्ये अंतर्भूत होते व तो साधारणत: ४० फूट रुंदीचा आहे.
(३) विषयांकित रस्ता रुंदीकरणामुळे एकूण ७१ सदनिका/घरे बाधित होत आहेत. प्रस्तुत रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या बांधकामाचे सर्वेक्षण बृहन्मुंबई महानगरपालिकेने केले असून परिशिष्ट-२ बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

विहित छाननी तथा उचित मान्यतेनंतर पात्र बांधकामधारकाना पर्यायी जागा देऊन महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंद करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या मालाड पश्चिम व मालवणी येथे पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहीन्या जुन्या झाल्याबाबत

**(८) १७७६४ (११-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मालाड पश्चिम व मालवणी येथे पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहीन्या २५ वर्ष जुन्या असुन गंजून जीर्ण झाल्या आहेत तसेच पाण्याच्या उच्च दाबामुळे या जलवाहिन्यांना भेगा पडून पाणी रस्त्यावर येऊन कित्येक वेळा जलवाहिन्यांच्या शेजारहून वाहणाऱ्या गटारांचे पाणी या जलवाहिन्यात शिरते व सदरचे दुषीत पाणी स्थानिक नागरीकांना प्यावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने मालाड व मालवणीला पाणी पुरवठा करणाऱ्या सदर गंजून जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. तथापि, दुषित पाण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांचे निराकरण त्वरीत करण्यात येते.

(२) मालाड (पश्चिम) व मालवणी भागातील पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी सन २०१०-१५ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत व काही जुन्या जलवाहिन्या बदललेल्या आहेत त्याची माहिती खालीलप्रमाणे :-

- १५० मी.मी. व्यासाची एकूण ३७४१ मी. लांबीची जलवाहिनी टाकलेली आहे.
- २५० मी.मी. व्यासाची एकूण ११३३ मी. लांबीची जलवाहिनी टाकलेली आहे.
- ३०० मी.मी. व्यासाची एकूण ३१४२ मी. लांबीची जलवाहिनी टाकलेली आहे.
- ४५० मी.मी. व्यासाची एकूण ८७५ मी. लांबीची जलवाहिनी टाकलेली आहे.
- ६०० मी.मी. व्यासाची एकूण २१५मी. लांबीची जलवाहिनी टाकलेली आहे.

तसेच, मालाड (पश्चिम) व मालवणी भागातील पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी सन २०१५-२०१६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने काही नवीन जलवाहिन्या टाकण्याचे व काही जलवाहिन्या बदलण्याचे प्रस्ताविले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्याचे व निविदा मागविण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत सुरु आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे :-

- १५० मी.मी. व्यासाची एकूण ३९०५ मी. लांबीची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.
- २५० मी.मी. व्यासाची एकूण ४५५ मी. लांबीची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.
- ३०० मी.मी. व्यासाची एकूण ४२९० मी. लांबीची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.
- ४५० मी.मी. व्यासाची एकूण ५५० मी. लांबीची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.
- मार्वे रोड ते लगून रोड पंपीगपर्यंत ९०० मी.मी. व्यासाची एकूण १५५० मी. लांबीची जलवाहिनी बदलण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथे खाजगी संस्थाच्यावतीने महानगरपालिकेने सुरु केलेल्या डायलिसीस केंद्राचे काम नियमबाह्यारित्या सुरु असल्याबाबत**

**(९) १९१३७ (१२-०८-२०१५). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत अनेक ठिकाणी खाजगी भागीदारी प्रकल्पांतर्गत (पीपीपी) खाजगी संस्थाच्या वतीने महानगरपालिकेने सुरु केलेल्या डायलिसीस केंद्राचे काम नियमबाह्यारित्या सुरु असून महानगरपालिकेशी कोणताही करार न करता सदर केंद्राचे कामकाज सुरु असल्याने या कामाबाबत अनेक रुग्ण, नातेवाईक व जनतेने तक्रारी केल्या आहेत, हे खर आहे काय,

(२) तसेच मुंबई घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयातील डायलेसिस सुविधा बंद असल्याची व या रुग्णालयात किती रुग्णांनी डायलेसिस उपचार घेतले आहे यांची माहिती आकडेवारी उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही. मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सात ठिकाणी पी.पी.पी. अंतर्गत डायलिसीस सुविधा सुरु करण्यात आलेल्या आहेत, यापैकी मनोहर वामन देसाई. मनपा रुग्णालय, मालाड (पूर्व) या रुग्णालयात मे.श्री.नेमिनाथजी जैन फाऊंडेशन या संस्थेबरोबर करार करण्यात आला आहे. तसेच उर्वरित ठिकाणी महानगरपालिकेच्या विहित पध्दतीनुसार डायलिसीस केंद्रे सुरु करण्यात आली असून, संस्थेबरोबर करार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथे शहरातील भाऊचा धक्का ते रेवस - मांडव**
**हा जलवाहतूक प्रस्ताव रद्द केल्याबाबत**

**(१०) १९६५७ (३०-०७-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएसआरडीसीच्या विचाराधीन असलेला मुंबई शहरातील भाऊचा धक्का ते रेवस - मांडव या सुमारे दीड हजार कोटी रुपयांचा मूळ जलवाहतूक प्रस्ताव शासनाने माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव रद्द करण्याची कारणे काय आहेत व या मार्गावरील जलवाहतूकीसाठी पर्यायी कोणती व्यवस्था केली जाणार आहे,

(३) या मार्गावरील वाहतूकीसाठी अद्यापही कोणताच निर्णय झाला नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र.IWT/०२१५/प्र.क्र३१/बंदरे१, दि.३०/६/२०१५ नुसार प्रकल्पाच्या अंमलबाजवणीचे अधिकारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून मरीटाईम बोर्डास हस्तांतरित करण्यात आला आहे.

(२) मुंबईच्या पुर्व किनाऱ्यावरभाऊचा धक्का-मांडवा-नेरुळया त्रिकोणी परिघात जलवाहतुक सुरु करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना शासन निर्णय क्र.IWT/०२१५/प्र.क्र३१/बंदरे१, दि.३०/६/२०१५ नुसार प्रकल्पाच्या अंमलबाजवणी यंत्रणा म्हणून घोषीत करण्यात आले आहे. सदरहू प्रकल्पास लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम खालील यंत्रणा या स्वखर्चाने करणार आहे.

- भाऊचा धक्का-मुंबई बंदर विश्वस्त
- मांडवा (अलिबाग)-महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड
- नेरुळ-शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ

सद्यस्थितीत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत मांडवा प्रकल्पाच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनाकरीता निविदा प्रक्रीयेच्या माध्यमातून मे. कोर्णाक इ.प्रा.लि. ला कंत्राट दिल्याबाबत**

**(११) २०३८५ (१०-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनाकरीता निविदा प्रक्रीयेच्या माध्यमातून मे. कोर्णाक इ.प्रा.लि. ला कंपनीला शहरातील कचरा उचलण्याचे कंत्राट दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदार कंपनीद्वारे कचरा व्यस्थापनामध्ये अक्षम्य दुर्लक्ष होत असून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यामार्फत कोणतीही कार्यवाही कंत्राटदारावर करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनाकरीता नव्याने निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून काम सुरु करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीद्वारे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कंत्राटदार कंपनीबाबत महानगरपालिका प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. तथापि, कचरा वाहतूक ठेकेदार मेसर्स कोणार्क इन्व्हायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांच्या कामावर उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दैनंदिन देखरेख नियंत्रण ठेवले जाते. ठेकेदाराच्या कचरा वाहतुकांच्या दैनंदिन कामाचे मुल्यांकन केले जाते. मुल्यांकनाअंती ठेकेदाराने केलेल्या कामाबाबत दंड आकारला जातो. त्यामुळे ठेकेदाराने कचरा वाहतुकीच्या कामात दुर्लक्ष केल्यास त्याच्या मासिक देयकातून उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दंडात्मक रक्कम कपात करण्यात येते.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका येथील घनकचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्लेवाट लावण्याबाबत**

**(१२) २०५१८ (११-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका येथील घनकचरा प्रचंड मोठया प्रमाणात निर्माण होत असून सदर कच-यांचे शास्त्रीय पध्दतीने विल्लेवाट लावण्याची कोणतीही यंत्रणा महानगरपालिकेकडे नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मार्च, २०१३ मध्ये ठाणे महानगरपालिकेत निर्माण होणा-या घनकच-याची प्रक्रिया इन्सीनरेशन पध्दतीने करुन विद्युत शक्ती निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेने सद्यस्थितीत धोरण निश्चित केले आहे काय, त्याबाबतचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ठाणे महानगरपालिकेच्या महासभा ठराव दिनांक २६.११.२०१० अन्वये वेस्ट टू एनर्जी बाबत (इ.ओ.आय.) E.O.I मागविण्यात आले व त्यानुसार M/s Renewgen Environment Ltd. with M/s hitachi Zosen Inova AG (मे.रीन्युगेन इनवेंचर लि. विथ मे.हिताची झोसेन इन्हा अे.जी.) यांची इन्सिनरेशनल तंत्रज्ञानाने घनकचरा प्रकल्प उभारण्यास मान्यता दिली आहे. तथापि, सदर तंत्रज्ञानाबाबत लोकप्रतिनिधी यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्याने अद्यापपर्यंत करारनामा करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खारघर (ता.पनवेल,जि.रायगड) येथे पाईप लाईनद्वारे गॅस पुरवठा करण्याकरिता महानगर गॅस कंपनीला येत असलेल्या अडचणींबाबत

**(१३) २१३४५ (०६-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) मध्ये पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा करण्याकरीता महानगर गॅस कंपनीला सिडको प्रशासन राईट टू यूज हा चार्ज लावीत असल्याने सदरहू योजना प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको प्रशासनाने राईट टू यूज हा नविन चार्ज महानगर गॅस कंपनीकडून मागितला असून हा चार्ज इतर कोणत्याही महानगरपालिका, नगरपालिका किंवा इतर संस्थाकडून आकारला जात नसल्याने सदरहू योजना पूर्णत्वास नेण्यास महानगर गॅस कंपनीला अडचण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कारणास्तव पाईप लाईनद्वारे गॅस पुरवठा करणाऱ्या योजनेचा लाभ घ्यायला विभागातील नागरिकांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेचा नागरिकांना लाभ होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) व (२) सिडको संचालक मंडळाने दि. १९.८.१४ रोजीच्या ठराव क्र. ११९६४ अन्वये नवी मुंबईमध्ये प्रतीवर्षी ८.३३% राखीव दराने व प्रतीवर्षी १५% वाढीव दराने नैसर्गिक वायु पाईपलाईन टाकण्याकरीता प्रथम ११ वर्षाच्या कालावधीकरीता आणि त्यानंतर नवीकरण करण्यात येणाऱ्या कालावधीकरीता Right of way (RoW) मध्ये मे.महानगर गॅस लि. यांना वापराच्या हक्कास परवानगी देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

मे.महानगर गॅस लि. यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) या संस्थांकडून Right of Use (RoU) शुल्क (Charges) आकारण्यात येत आहेत.
(३) मे.महानगर गॅस लि. यांनी शुल्क (Charges) न भरल्याने परवानगी मिळालेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) येथील शताब्दी रुग्णालय तसेच संलग्न वैद्यकीय महाविद्यालयात पायाभूत सोयीसुविधा व आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत**

**(१४) २२८५० (११-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) येथील शताब्दी रुग्णालय तसेच संलग्न वैद्यकीय महाविद्यालयात पायाभूत सोयीसुविधा आणि आकृती बंधानुसार आरोग्य कर्मचा-याची नेमणूक करण्याबाबतची मागणी स्थानिक जागरुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, मा. सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री, मा. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री, महासंचालक आरोग्य सेवा संचालनालय, उपसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, जिल्हाधिकारी मुंबई पूर्व उपनगरे यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखेर पर्यंत कोणती कार्यवाही पूर्ण करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) येथील शताब्दी रुग्णालयात कर्मचा-यांची मागणी करण्यात आली आहे व सदर पदे निर्माण करण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(२) पं.मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालय, गोवंडी हे २१० रुग्णशय्या असलेले सर्वसाधारण रुग्णालय आहे. सदर रुग्णालयाचे ६०० रुग्णशच्यांचे रुग्णालय विस्तारीकरणाचा प्रस्ताव केलेला असून, सदर रुग्णालयात सर्व पायाभूत सोयीसुविधा महापालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
(३) सदर रुग्णालयाच्या विस्तारीकरणाचा आराखडा तयार असून सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवाजीनगर गोवंडी (मुंबई उपनगर जिल्हा) येथील खाजगी कब्रस्तानाच्या नुतनीकरण व दुरुस्तीबाबत

**(१५) २२८६२ (११-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर गोवंडी (मुंबई उपनगर जिल्हा) येथील खाजगी कब्रस्तानाच्या नुतनीकरण व दुरुस्तीबाबत कार्यवाही गठीत करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी व पदाधिका-यानी मा.मुख्यमंत्री मा. नगरविकास राज्यमंत्री, आयुक्त बृ.मुं.मनपा, अतिरिक्त आयुक्त बृ.मुं. मनपा, सहाय्य आयुक्त (एम/पूर्व बृ.मुं.मनपा) यांच्याकडे दिनांक ०३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) शिवाजीनगर गोवंडी विभागात देवनार संयुक्त (हिंदू, मुस्लीम व ख्रिश्चन) स्मशानभूमी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत आहे.

सदर स्मशानभूमीच्या दुरुस्तीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य पायाभूत सुविधा कक्षाकडून संयुक्त स्मशानभूमीसाठी व Dog Kennel दुरुस्तीसाठी रु.९० लाखांची तरतूद करुन निविदा मागवून पात्र निविदाधारकांची निवड होऊन सद प्रकरण मंजुरीसाठी महापालिकेच्या स्थापत्य समितीकडे सादर करण्यात आले आहे. याबाबत मंजुरी मिळताच सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सुरु करण्यात येणार आहे.

तसेच, रफीक नगर येथे सिया व सुन्नी जनतेसाठी मुस्लीम कब्रस्तान (मनपा संचालित) चे बांधकाम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या विरोधात बांधकाम व्यावसायिकांनी रस्ता रोको आंदोलन केल्याबाबत

**(१६) २३१५८ (११-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या विरोधात बिल्डर, इंजिनिअर, आर्किटेक्ट आणि छोट्या बांधकाम व्यावसायिकांनी दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मुंबई-आग्रा महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचा तपशिल काय,
(३) प्रश्न भाग (१) च्या अनुषंगाने प्रश्न भाग (२) मधील मागण्यांबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६)** :(१) होय.
(२) सदर मागण्यांचा तपशील नाशिक महानगरपालिकेस देणेत आलेला नव्हता.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारादरम्यान रुग्णांचे होत असलेले मृत्यू**

**(१७) २३५०४ (११-०८-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारा दरम्यान २००१ पासून दरवर्षी १ हजारांहून अधिक रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील वर्षातील मृत्यूची आकडेवारीवरुन दर दिवसाला तीन ते चार रुग्ण दगावत असल्याचे स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हृदयविकार, ब्रेन हॅमरेज, किडनी फेल व नवजात बालकांच्या आजारांवरील साधनसामुग्री व डॉक्टर या रुग्णालयात उपलब्ध नसल्याने मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयात साधनसामुग्री व डॉक्टरांची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६)** :(१) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या वार्षिक सांच्यिकीपत्रानुसार सन २००१ ते सन २०१४ या कालावधीत वार्षिक सरासरी ९९५ मृत्यू झाले आहेत.
(२) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या वार्षिक सांख्यिकी पत्रानुसार रुग्णालयात साधारणत: दिवसाला २ ते ३ रुग्ण मृत पावतात
(३) सामुग्री व डॉक्टर या रुग्णालयात उपलब्ध नसल्यने मृत्युचे प्रमाण वाढत असल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे नाही.

हृदविकाराच्या शल्यविषयक उपचारांची सुविधा या रुग्णालयात उपलब्ध नाही. परंतु मेडिसीन विभाग व तेथे येणारे मानसेवी हदरोग तज्ञ यांचेमार्फत रुग्णांवर वैद्यकीय उपचार केले जातात.

ब्रेन हॅमरेजबाबत रुग्णांवर वैद्यकीय उपचार केले जातात परंतु शल्यविषयक उपचार सुविधा या रुग्णालयात उपलब्ध नाहीत.

किडनी फेल होणाऱ्या रुग्णांसाठी खाजगी सरकारी सहकारी तत्वावर (PPP) रुग्णालयात उपचार केंद्र उपलब्ध आहे.

नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभाग व आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध असून बालरोग तज्ञांमार्फत इलाज केले जातात.

(४) रुग्णालयात एकुण १३० पैकी ९५ पदे भरली असून रिक्त असणाऱ्या पदांपैकी २६ पदांसाठी मुलाखती होऊन नेमणूका केल्या जाण्याची प्रक्रिया सुरु आहे. विहीत प्रक्रिया राबवुन आवश्यकतेनुसार नियमित साधनसामुग्री खरेदी केली जाते व खरेद प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) अंतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१८) २३७४८ (११-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) अंतर्गत प्रकल्पग्रस्त कुटुंबाची (प्र.क्र) जोगेश्वरी विक्रोळी जोड रस्ता आणि पश्चिम द्रुतगती मार्ग येथील लोकांच्या पुनर्वसन करण्यासाठी १२०० गाळयांचे बांधकाम करण्याचे कंत्राट कार्यकारी समिती (का.स), मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांनी मे. पटेल इंजिनियरिंग मर्यादित या कंत्राटदाराला माहे मार्च, २००४ मध्ये ४०.३४ कोटी रुपये देऊन सदरचे काम दिनांक १४ मार्च, २००५ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिनांक १५ मार्च, २००४ रोजी देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कराराप्रमाणे विनिर्दिष्टीत २ टप्प्यात अनुसरण्यात आलेल्या प्रत्येक दिवसांच्या विलंबासाठी कंत्राटदाराने निर्धारित नुकसान भरपाई प्रदान करावयाची होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामाच्या समाप्तीतील विलंबानंतर, आधी फेटाळलेल्या असंयुक्तिक आधारावर कंत्राटदाराने कराराविष्ट असलेल्या महत्वाच्या टप्प्यांना काढून टाकल्यामुळे करारातील अटीचे उल्लंघन झाले आणि कंत्राटदारांला रु. १.०५ कोटीचा गैरवाजवी फायदा मिळाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) व (२) होय.

(३), (४) व (५) सदर कामाच्या प्रगतीच्या वेळी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने वेळोवेळी कामाचा आढावा घेवून कामाची धिमी प्रगती कंत्राटदाराच्यानिदर्शनास आणून दिली होती. कामाच्या प्रगतीत सुधारणा न केल्यामुळे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या शिफारसीनुसार

कंत्राटदाराच्या देयकातून वेळोवेळी करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार ठरावितक रक्कम राखून ठेवण्यात आली होती. प्रथमत: कंत्राटदाराने सादर केलेली वेगवेगळी कारणे मान्य न करता कामाच्या प्रगतीत सुधारणा होण्यासाठी व कंत्राटदारावर दबाव पडण्यासाठी नुकसान भरपाईची रक्कम देयकातून रोखून ठेवण्यात आली होती.

परंतु मध्यंतराच्या काळात कंत्राटदाराने सादर केलेल्या कारणांची पडताळणी प्र.व्य.स.मार्फत करण्यात येवून ती कारणे कंत्राटदाराच्या आवाक्याबाहेरची आहेत याची खात्री करुन घेवून कामाला मुदतवाढ देण्यासाठी शिफारस करण्यात आली होती.

जागतिक बँकेकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर कंत्राटदाराला २५/१०/२००५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती व करारनामाच्या अटीनुसार रोखून ठेवण्यात आलेल्या रक्कमेचा कंत्राटदाराला परतावा ऑगस्ट, २००७ मध्ये करण्यात आला होता. या संदर्भातील मा.महालेखापालांच्या लेखा परिक्षकांच्या आक्षेपांच्या अनुषंगाने अंतिम देयक अदा करते वेळी सदर रक्कम सक्षम प्राधिकाऱ्यांकडून निर्णय येईपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमार्फत पुनश्च रोखून ठेवण्यात आली आहे.

---

## कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लाच घेताना पकडल्याबाबत

**(१९) २३९०३ (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात बेकायदेशीर वाळू डंपर सोडताना कुडाळ पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक श्री.विजय तांबे यांना दिनांक १९ मार्च २०१५ रोजी वा त्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लाच घेताना पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस नाईक श्री.विजय तांबे यांनी कबुली देऊन यामध्ये बड्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे सांगितली असून या प्रकरणाची चौकशी करावी असे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा.गृह राज्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची विभागीय पोलीस महासंचालक यांच्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले व पुढील कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) होय. मात्र तक्रारदार श्री.प्रज्योत नाईक, रा.मु.पो. सरंबळ ता.कुडाळ यांनी ज्या डंपर मालक चालकांना वाळू दिली त्यांचे वाळूचे डंपर वाहतुकीकरिता व त्यांचेवर कारवाई न करण्याकरिता तक्रारदार यांचेकडे रु.५०००/- इतकी लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.३०००/- इतकी रक्कम स्विकारल्याने पोलीस नाईक श्री.विजय मोहन तांबे यांना रंगेहाथ पकडयात आले. या संदर्भात, श्री.तांबे यांचेविरुध्द कुडाळ

पोलीस स्टेशन येथे गुरक्र.३००५/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये दि.१९.०३.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(२) होय. या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांना दिनांक निरंक व दि.२७.०४.२०१५ रोजी निवेदन सादर केले आहे.

(३), (४) व (५) लोकप्रतिनिधीनी मा.राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांना सादर केलेल्या दिनांक निरंकच्या निवेदनाच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, सावंतवाडी विभाग यांच्या मार्फत चौकशी केली आहे. सदर चौकशीमध्ये अवैध वाळू वाहतूकीच्या अनुषंगाने कुडळा पोलीस ठाणे येथे २९ केसेस मध्ये ३९ अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपर वर कारवाई केली आहे. सदर कारवाईमध्ये तहसिलदार कुडाळ यांनी रुपये १४,२७,०००/- इतका दंड वसूल केला आहे. तसेच अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर व सदर व्यवसायाशी संबंधितांवर मोटर वाहन कायदा, भा.दं.वि. संहिता कायद्याखालील केसेस, सीआरपीसी १०९ व ११० प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई तसेच मुंबई पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे हद्दपार प्रस्ताव सादर करणे अशा प्रकारची कारवाई केली आहे. त्याचप्रमाणे कालावल खाडी पात्रात महसूल विभागाने सिल करुन ठेवलेल्या होड्या मुक्त करुन वाळू उत्खनन व वाहतूक करणे तसेच महसूल विभागाचे कर्मचारी यांना शिवीगाळ करुन सरकारी कामात अडथळा निर्माण करणे याबाबत तहसिलदार माळवण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माळवण पोलीस ठाणे येथे २६ लोकांविरुध्द गु.र.क्र.३८/२०१५, भा.दं.वि. कलम ३७९, ३५३, १४७, १५२, ३४, ५०४, ५०६, ११७ प्रमाणे दि.३०.०४.२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांना सादर केलेल्या दि.२७.०४.२०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी चौकशी केली असून त्यामध्ये पोलीस नाईक श्री.तांबे यांचे अवैध वाळू व्यवसायासंदर्भात कोणताही पोलीस अधिका-यांशी अर्थपूर्ण संबंधि असल्याचे आढळून आले नाही.

याच विषयासंदर्भात महासंचालक, चाललुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे कुडळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.बिराजदार यांचेविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. तथापि, चौकशीमध्ये कुडाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांचा सहभाग असल्याचे आढळून आले नाही.

---

**नाशिक येथील सातपुर भागातील पोलीस वसाहतीतील**
**सदनिका विना वापर पडून असल्याबाबत**

**(२०) २४६२१ (१२-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सातपुर भागातील पोलीस वसाहतीतील निम्म्याहून अधिक सदनिका विना वापर पडून असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिका विना वापर पडून असण्या मागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पोलिस वसाहतीतील सदनिकांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देऊन या सदनिका वितरीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६)** :(१), (२) व (३) एकूण ३० निवासस्थानांपैकी ६ निवासस्थाने रिक्त आहेत. पोलिस वसाहतीतील सदनिकांची किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी करण्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येऊन पोलिस कर्मचा-यांना निवासस्थाने वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबई शहरातील 'व्हिक्टोरीया' (घोडागाडी) व्यवसायाशी संबंधित कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२१) २५०१५ (१०-०८-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील अनेक पारंपारिक आकर्षनांपैकी एक 'व्हिक्टोरीया' (घोडागाडी) या बेकायदा व केवळ मौजेसाठी घोड्यांना जुंपणारा असल्याचा निर्वाळा मा.उच्च न्यायालयाने दिनांक ८ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास देऊन या घोडागाड्यांना कायमचा लगाम लावून या व्यवसायातील जवळपास ७००० कुटुंबाचे आणि घोड्यांचे पुनर्वसन करावे याबाबतचे धोरण शासनाने दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत आखावे आणि एक वर्षानंतर पालिका आणि सरकारने बंदी अंमलात आणावी असे आदेश ॲनिमल्स ॲण्ड बर्डस् चॅरिटेबल ट्रस्टने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशान्वये शासनाने व महानगरपालिकेने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. ३६/२०११ मध्ये दिनांक ०८.०६.२०१५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार घोडागाडी/व्हिक्टोरिया व्यवसायाशी संबंधित कुटूंबियांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी दिनांक १०.११.२०१५ रोजी प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुत प्रकरणी मनोरंजनाकरीता घोडागाडी चालविणाऱ्या व्यक्तींच्या कुटूंबियांच्या पुनर्वसनाबाबत गृह विभागाने दिनांक ३१.१२.२०१५ रोजी शपथपत्र दाखल करुन दिनांक, ३१.०३.२०१६ पर्यंत ३ महिन्यांची मुदतवाढ देण्याची विनंती मा.न्यायालयास केली आहे.

तसेच, मनोरंजनाकरीता घोडागाडी चालविणाऱ्या व्यक्तींच्या कुटूंबियांच्या पुनर्वसनाबाबत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने, या कुटूंबियांच्या पुनर्वसनाबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनास तातडीने पाठविण्याबाबतच्या सूचना दिनांक ०६.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

---

**भाभा रुग्णालय, कुर्ला आणि पंडीत मदनमोहन मालवीय (गोवंडी शताब्दी) या रुग्णालयात सीटीस्कॅन तर घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात एमआरआय स्कॅनची सुविधा नसल्याबाबत**

**(२२) २५९२० (१०-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाभा रुग्णालय, कुर्ला आणि पंडीत मदनमोहन मालवीय (गोवंडी शताब्दी) या रुग्णालयात सीटीस्कॅन तर घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात एमआरआय स्कॅनची सुविधा नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात सीटी स्कॅन व एमआरआय स्कॅन या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

राजावाडी रुग्णालयात सीटी स्कॅन सुविधा उपलब्ध आहे.

(२) भाभा रुग्णालय, कुर्ला येथे सीटी स्कॅन व राजावाडी रुग्णालयात एम.आर.आय. चालू करण्याबाबत सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन अंतर्गत समूह -१ नुसार ई-निविदा मागवून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आली होती. तथापि, प्रथम लघुत्तम ई-निविदा धारकाने ई-निविदेच्या अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे प्रथम लघुत्तम धारकास दिलेले कंत्राट सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीने रद्द करण्यात आले असून यासाठी पुन्हा ई-निविदा मागविण्यात येणार आहे.

तसेच भाभा रुग्णालय, कुर्ला येथे रुग्णालयाच्या इमारतीच्या दुरुस्त होईपर्यंत येथे कोणतेही नवीन प्रकल्प सुरु करु नयेत अशा सूचना तांत्रिक सल्लागार समितीकडून प्राप्त झाल्या असल्यामुळे रुगणालयाची संपूर्ण दुरुस्ती झाल्यानंतर सी.टी.स्कॅन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

पंडीत मदनमोहन मालवीय (गोवंडी शताब्दी) या रुग्णालयात सीटी स्कॅन सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जागा निश्चित केलेली असून, सार्वजनिक-खाजगी लोकसहभाग प्रोत्साहन अंतर्गत महापालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

राजावाडी रुग्णालय, घाटकोपर येथे एम.आरआय. सुविधा सार्वजनिक-खाजगी लोकसहभाग प्रोत्साहन अंतर्गत सुरु करण्यंची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणेसाठी विलंब होत असल्याबाबत

**(२३) २८४२७ (२१-०१-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे जागतिक दर्जाचे भव्य स्मारक उभारण्यासाठी माहे मार्च २०१५ मध्ये तीन आंतरराष्ट्रीय निविदा आलेल्या असूनही माहे ऑगस्ट २०१५ मध्ये पुन्हा नव्याने टेंडर काढल्यामुळे शिवस्मारकाबाबत शासनाकडून विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ रोजी स्मारकासाठी केंद्र शासनाच्या विविध परवानग्या प्राप्त होवूनही मंत्रालयीन विभाग किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर जबाबदारी न टाकल्यामुळे सदर कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर स्मारकाच्या उभारणीसाठी अद्याप सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिवस्मारकाचे काम लवकरात लवकर सूरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६)** :(१) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीसाठी तिसऱ्या निविदेच्यावेळी प्राप्त झालेल्या तीन निविदांपैकी निम्नतम ठरलेल्या निविदाकाराने शासनाच्या अटी-शर्तीनुसार काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने त्या निविदा रद्द करुन ऑगस्ट, २०१५ मध्ये चौथ्यांदा मागविण्यात आल्या.

(२), (३), (४) व (५) स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीकाेनातून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

---

## रोजगार व स्वयंरोजगार समितीच्या शिफारशी लागू करणेबाबत

**(२४) २८५३१ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुशिक्षीत बेरोजगार तरूण-तरूणींना प्रभावी पध्दतीने रोजगार उपलब्ध होण्यासाठी विधीमंडळाने गठीत केलेल्या रोजगार व स्वयंरोजगार समितीने तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होवून कौशल्य विकासावर भर देण्याच्या शिफारशी शासनास सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने केलेल्या शिफारशींचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१६) :**(१) होय.

दि. ०७.०१.२०१४ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील विधीमंडळ सदस्यांच्या गठीत समितीची बैठक पार पडली, तथापि, विधीमंडळ सदस्यांच्या समितीच्या अंतिम शिफारशीचा अहवाल शासनास अद्याप सादर झालेला नाही.

(२) दि. ०७.०१.२०१४ च्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारशीस अनुलक्षून रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेश केंद्रात रुपांतर करणे ही योजना प्रथम टप्प्यात मुंबई उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासन निर्णय दि. १९.०५.२०१४ अन्वये राबविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. दरम्यानच्या कालावधीत बदलेल्या राजकी य परिस्थितीत मा.राज्यमंत्री यांच्या अध्यक्षते खालील विधीमंडळ सदस्यांच्या समितीची पुनर्रचना करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या नियुक्तीबाबत

**(२५) २९०२६ (२१-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. संतोष खांडेकर यांची दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी बल्लारपूर नगरपरिषद (जि. चंद्रपूर) येथे मुख्याधिकारी पदावर करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.संतोष खांडेकर हे बल्लारपूर येथे शासन आदेश असतानाही रुजू झाले नाही म्हणून त्यांची बदली दि.२९/०७/२०१५ रोजी कामठी नगरपरिषद (जि. नागपूर) येथे मुख्याधिकारी पदावर बदली केली होती परंतु श्री खांडेकर यांची दि. २८/०८/२०१५ रोजी कामठी नगरपरिषद येथून परत बदली करण्यात येवून त्यांना प्रादेशिक उपसंचालक, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग येथे पदस्थापना देण्यात आली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री. खांडेकर यांची दिड महिन्याच्या अंतराच्या कार्यकाळामध्ये ३ वेळा वेगवेगळ्या ठिकाणी पदस्थापनेत बदल व बदली करण्याचा शासनाचा काय हेतू व उद्देश होता तसेच या सर्व प्रकरणात नगरविकास सचिव यांच्या कार्यकाळातील कोणते अधिकारी व कर्मचारी यांचे इतके हितसंबध वरील अधिकाऱ्यांशी आहे कि ज्यामुळे त्यांच्या मर्जीनुसार त्यांना पदस्थापना देण्यात आल्या, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) श्री.संतोष खांडेकर हे बदलीस पात्र असल्यामुळे त्यांची बदलीने नियुक्ती बल्लारपुर येथे करण्यातआली. सदर पदावर ते रुजु झाले नाहीत. दरम्यानच्या कालावधीत बल्लारपूर, नगर परिषद येथे अन्य अधिकाऱ्यांचीनियुक्ती केली असल्यामुळे श्री.खांडेकर यांची कामठी नगर परिषदेतील रिक्त झालेलया पदावर बदली करण्यात आली.

श्री.खांडेकर हे कामठी नगर परिषद येथे रुजु न झाल्याबाबतचा त्यांचा विनंती अर्ज विचारात घेऊन तसेच प्रादेशिक उपसंचालक औरंगाबाद हे पद प्राधान्याने भरण्याच्या दृष्टीकोनातून श्री.खांडेकर यांची कामठी नगर परिषद, नागपूर या पदावरुन प्रादेशिक उपसंचालक, औरंगाबाद विभाग या पदावर सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्ह्यातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) २९१९२ (२१-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यात रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाकडे सुमारे ७५ हजार बेरोजगारांची नोंदणी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी किती बेरोजगारांना शासनाने रोजगार उपलब्ध करून दिला आहे,

(३) असल्यास, सदर कार्यालयाच्या उपयुक्ततेबाबत शासन स्तरावर आढावा घेण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन कोणते धोरण अवलंबणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा कार्यालयाचा डिसेंबर, २०१५ अखरेचा नोंदणीपट ८५७६५ इतका आहे.

(२) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्र, बुलढाणा कार्यालयामार्फत सन २०११ पासून सन २०१५ अखेरपर्यंत ५८१४ उमेदवांराना नोकरी लागली आहे.
(३) होय. सद्य:स्थितीत कौशल्य विकासासंबंधी अनेक उपक्रम शासनाने हाती घेतले असून हे उपक्रम राबविण्यासाठीह्या कार्यालयाची उपयुक्तता आहे.
(४) बेरोजगारांना रोजार उपलब्ध होण्यासाठी शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत रोजगार मेळावे, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत १) रोजगार केंद्रित कौशल्य प्रशिक्षण, २) उद्योग केंद्रित कौशल्य विकास कार्यक्रम, ३) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम इ. विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथील एकात्मीक आदिवासी प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिका-याला लाच घेताना पकडल्याबाबत**

**(२७) २९३१३ (२१-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथील एकात्मीक आदिवासी प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकारी यांना १५ हजार रुपयांची लाच घेतांना रंगेहाथ पकडल्याने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारणा कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) यशवंत मानव विकास प्रशिक्षण बहुउद्देशिय संस्था, अमरावती या संस्थेने विशेष केंद्रीय सहाय्य या योजनेखाली सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला बचत गट व वैयक्तिक शिक्षित /आशिक्षित बेरोजगार युवक युवतींना आचारी कौशल्य विकसित करुन तसेच विक्री प्रतिनिधीचे कौशल्य विकसित करणेबाबत लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. त्यानुअषंगाने महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत संस्थेस बिल मजूर झाले असून त्यातील ८० टक्के रक्कम संस्थेस मिळाली आहे. उर्वरित २० टक्के रक्कम देण्यासाठी लोकसेवक श्री.बन्सीलाल महादेव पाटील, सहायक प्रकल्प अधिकारी यांनी तक्रारदार श्री.आकाश मेटे यांचेकडे दि.२५.०८.२०१५ रोजी रुपये १५,०००/- लाचेची मागणी करुन ती स्विकारली आहे. या संदर्भात श्री.बन्सीलाल पाटील, सहायक प्रकल्प अधिकारी यांचेविरुध्द आझाद नगर पोलीस स्टेशन, धुळे येथे गु.र.क्र.३०५/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७,१३(१)(ड), १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि.२५.०८.२०१५ रोजी

अटक करण्यात आली होती. मा.न्यायालयाने त्यांना दि.२८.०८.२०१५ रोजी जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेण्याची कार्यवाही सुरु आह. त्याचप्रमाणे लोकसेवक श्री.पाटील यांना आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.२६.०८.२०१५ च्या आदेशान्वये अटक झाल्याच्या दिनांकापासून (दि.२५.०८.२०१५) शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**मंगळवेढा शहर (जि.सोलापूर) व तालुक्यातील अनेक गावातील नागरीक आधारकार्ड पासून वंचित असल्याबाबत**

**(२८) २९३१४ (२१-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा शहर (जि.सोलापूर) व तालुक्यातील अनेक गावातील नागरीक आधारकार्ड पासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधार कार्ड काढण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने ग्रामीण भागात १०० रुपये आकारले जात असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१६) :**(१) नाही,

मंगळवेढा तालुकयातील ऑगस्ट २०१५ अखेर ८२.६१% आधार नोंदणी पूर्ण झाली असून जानेवारी २०१६ अखेर ८८.७९% आधार नोंदणी पूर्ण झालेली आहे.

(२) व (३) मंगळवेढा तालुक्याकरिता २२ आधार किट्स पुरविण्यात आली असून एक किट मंगळवेढा तालुका कार्यालयात कायम स्वरुपी ठेवण्यात आले आहे. मंगळवेढा तालुक्यातील महा ई सेवा केंद्रातून विविध अंगणवाडी तसेच शाळा, महाविद्यालयातून आधार नोंदणी नि:शुल्क सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यात खजिन क्षेत्र कल्याण योजनासाठी आलेला कोट्यावधी रुपयांचा निधी केंद्र शासनाकडे परत गेल्याबाबत**

**(२९) २९५९४ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात आलेल्या खनिज क्षेत्र कल्याण योजना कोट्यावधी रुपयांचा निधी केंद्र शासनाकडे परत गेल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी खर्च करण्यासाठी आवश्यक सिंधुदूर्ग जिल्हा खनिज फाऊंडेशनची स्थापनाच झाली नसल्याने निधी परत गेला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने खनिज फाऊंडेशनची स्थापना करुन हा निधी पुनःश्च उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०३-२०१६) :**(१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वर्कशॉपचे छप्पर तुटल्याने गळती लागल्याबाबत**

**(३०) २९८४५ (२१-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वर्कशॉपचे छप्पर तुटल्याने ऐन पावसाळ्यात वर्कशॉपला गळती लागल्याने माहे ऑगस्ट, २०१५ या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या तुटलेल्या छप्पराची दुरुस्ती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६) :**(१) होय.
(२) उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी दिनांक ०५ ऑगस्ट, २०१५ व दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी पाहणी केलेली आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आवश्यक ती दुरुस्ती करण्याबाबत पाठपुरवा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात राज्य व केंद्राच्या कामगार कायद्यात कामगारांविरोधात बदल करण्यात आला असल्याबाबत

**(३१) २९८७३ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात राज्य व केंद्राच्या कामगार कायद्यात कामगारांविरोधात बदल करण्यात आला असून उद्योगांच्या हितासाठी कामगारांचा बळी देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे सर्व जिल्ह्यातील कामगार शेतकरी संघटनानी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड धडक मोर्चा काढून निषेध करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार कायद्यात बदल करण्यात येवून कामगारांचा बळी देणाऱ्या दोषीवर कारवाई करण्याबाबत व कामगारांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०२-२०१६) :**(१) होय.

कामगार संघटनांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी पुकारलेल्या देशव्यापी संपाच्या वेळी कामगार व शेतकरी संघटनांनी जिल्हाधिकारी नाशिक कार्यालयावर मोर्चा नेला.

(२) व (३) कामगारांच्या हिताचे बदल करण्यात येत असून कामगार संघटना व मालक यांच्याकडून सूचना व हरकती प्राप्त करुन कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली समिती शासनास शिफारशी करणार आहे. सबब कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## कौंडल्यपुर बिलदोरी (ता.तिवसा जि.अमरावती) येथील नाल्याच्या पुरात कार वाहून गेल्याने चार जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३२) ३०१२७ (२१-०१-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौंडल्यपुर बिलदोरी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील नाल्याला मोठा पूर येऊन नाल्यावरील पुलाचा अंदाज न लागल्याने कार पुरात वाहून चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर घटनेची चौकशी ठाणेदार, कुऱ्हा पोलीस ठाणे यांनी केली आहे. वळण रस्ता असल्यामुळे वाहनचालकास पुराचे पाणी दिसले नाही व त्यामुळे पुराच्या पाण्यात गाडी वाहून गेल्याने चार जणांचा मृत्यू झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. सदर घटनेत कोणताही संशयाचा प्रकार आढळून आलेला नसून पोलीस ठाणे कुऱ्हा येथे अकस्मात मृत्यू समरी क्र.३०/१५, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १७४ प्रमाणे नोंद घेऊन न्यायालयामध्ये दि.३१.१२.२०१५ रोजी मंजुरीकरीता पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पत्रकारांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत**

**(३३) ३०८०० (२१-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पत्रकारांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र संपादक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी मा. मुख्यमंत्री यांची ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात भेट घेऊन निवेदनाव्दारे मागणी केलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पत्रकारांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) याबाबतचे लेखी निवेदन आढळून आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कंबाटा एव्हिएशन प्रा.लि.या कंपनीच्या व्यवस्थापनातील**
**अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्याबाबत**

**(३४) ३०८१६ (२१-०१-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंबाटा कंपनीत काम करणाऱ्या शेकडो कामगारांनी दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास, श्री.मंगेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या कुटुंबियांसहीत सहार पोलीस ठाण्याबाहेर त्यांच्या विविध मागण्यांकरिता उपोषणाला सुरूवात केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंबाटा एव्हिएशन प्रा.लि.या कंपनीच्या व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांविरोधात गु.र.२३०/२०१३ आणि ११५/२०१५ याप्रमाणे विविध कारणांकरिता एकूण तीन गुन्हे नोंदवूनही

सहार पोलीस ठाण्यामधून कंपनी विरोधात कोणतीही कारवाई अद्यापपर्यंत करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनी विरोधात कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) सदर कंपनी विरोधात कारवाई न करणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे नाही. कंबाटा एव्हिएशन प्रा.लि. या कंपनीच्या व्यवस्थापनातील अधिकाऱ्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या गु.र.क्र. २३०/२०१३ या गुन्ह्याचा तपास पुर्ण झालेला आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल केले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, गु.र.क्र.११५/२०१५ या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देगलूर जिल्हा नांदेड ह्या नविन इमारतीच्या बांधकामाबाबत

**(३५) ३२२५७ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देगलूर (जिल्हा नांदेड) येथील नविन इमारतीचे बांधकाम काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत हस्तांतरीत करण्यात आली काय, असल्यास संस्थेने प्रत्यक्षात कामास सुरुवात केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) व (२) नाही.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विद्युतीकरण व अंतर्गत पाणी पुरवठ्याची कामे पुर्ण झाली नसल्याने संस्थेच्या इमारत हस्तांतरणास विलंब होत आहे.

---

## मुंबई येथील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे कार्यालय केंद्र शासनाच्या राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानासाठी ताब्यात घेतल्याबाबत

**(३६) ३२३०४ (२३-१२-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनस जवळील तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे कार्यालय केंद्र शासनाच्या राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानासाठी कोणतीही पुर्वसुचना न देता ताब्यात घेतल्याने जवळपास २५० कर्मचाऱ्यांना कार्यालयाबाहेरच खुर्च्या मांडून कामकाज करावे लागत असल्याची बाब माहे

ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यालयाअभावी उघड्यावर बसणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६)** :(१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१११५/प्र.क्र.१६४/विशि-३, दिनांक १४.०७.२०१५ अन्वये राज्यात राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण योजनेंतर्गत (रुसा) राज्य प्रकल्प स्थापन करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या एलफिस्टन तंत्र शिक्षण शाळेच्या आवारातील पहिल्या मजल्यावरील अर्धा भाग तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि विषयाधीन जागा आता कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली असल्याने रुसा कार्यालयासाठी जागेचे हस्तांतरण करण्यात आली नाही. आता रुसा प्रकल्पासाठी जागतिक व्यापार केंद्र (WTC) येथील १९ व्या माळ्यावर भाडे तत्वावर जागा घेण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) येथे आयटीआयची इमारत उभारण्याबाबत**

**(३७) ३२४४८ (२३-१२-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारावी येथे शासनाने २ वर्षापूर्वी आयटीआय सुरु केले असून या आयटीआयसाठी जागाही उपलब्ध करुन देण्यात आली असतानांही आजमितीस धारावी येथील आयटीआयची इमारत नसल्याने महालक्ष्मी येथील आयटीआयच्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थ्यांना समावून घेतले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयटीआयच्या www.dvet.gov.in या वेबसाईटवर धारावी आयटीआयचा पत्ता देण्यात आला असून मात्र प्रत्यक्षात तेथे काहीच अस्तितत्वात नसल्याने धारावीत आयटीआयचा शोध घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची शासनाकडून फसवणूक होत आहे,हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, धारावी येथे आयटीआयची इमारत उभारण्यास व आयटीआय केंद्र कार्यन्वित करण्यास होण्या-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६)** :(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) धारावी येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासकीय इमारत व कार्यशाळा बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावाच्या छाननीअंती रुपये १५.९५ कोटी इतक्या अंदाजपत्रकाच्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शवून, प्रस्ताव सचिव समिती समोर ठेवण्याचे निर्देशित केले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**हिंगोली जिल्ह्यात गौणखनिज विकास निधी अंतर्गत कामे मंजुर न झाल्याबाबत**

**(३८) ३३११४ (२१-०१-२०१६). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात खनिज विकास निधी अंतर्गत सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षात एकही काम मंजूर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खनिज विकास निधी अंतर्गत हिंगोली जिल्ह्यात कामे मंजूर करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा. खनिकर्म मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनांवर काय कार्यवाही करण्यात आली व सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षात एकही काम मंजूर न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी प्रस्तावित केलेल्या कामांना निश्चित किती कालावधीत मंजूरी देण्यात येईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०३-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सन्माननीय लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ३१.०३.२०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर व जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिनांक २२.०४.२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

खनिज विकास निधी अंतर्गत सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात हिंगोली जिल्ह्यातील खाण बाधित क्षेत्रातील एकही प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांच्याकडे प्राप्त न झाल्यामुळे निधी उपलब्ध होऊ शकला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कापसी (ता.लोहा, जि.नांदेड) येथे लाच घेताना महाराष्ट्र ग्रामणी बँकेच्या शाखा व्यवस्थापकांला पकडल्याबाबत**

**(३९) ३३९५५ (१०-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापसी (ता.लोहा, जि.नांदेड) येथे किसान क्रेडीट कार्डवर कृषी कर्ज मंजूर करुन देण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच घेतांना महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखा व्यवस्थापकांला दिनांक १ जुलै, २०१५ रोजीच्या सुमारास पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६)** :(१) होय.

(२) व (३) श्री.केशव शिवराम कपाळे यांच्या कृषी गंगा किसन क्रेडीट कार्ड वर कर्ज मंजूर करणेसाठी श्री.शिवाजी रामराव कवडे, शाखा अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा कापसी (बु.), ता.लोहा यांनी रुपये ५,०००/- इतकी लाचेची मागणी करुन खाजगी इसम श्री.अजय पडघन यांचेमार्फत दि.०१.०७.२०१५ रोजी स्विकारली आहे. त्याअनुषंगाने शाखाधिकारी व खाजगी इसम यांचेविरुध्द उस्माननगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२१/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३(१)(ड) व १३(२) अन्वये दि.०२.०७.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने लोकसेवक श्री.कवडे व खाजगी इसम श्री.पडघन यांचेविरुध्द मा.विशेष न्यायालय, कंधार, जिल्हा नांदेड येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष खटला क्रमांक ११/२०१५ आहे. त्याचप्रमाणे लोकसेवक श्री.शिवाजी कवडे यांना दि.०२.०७.२०१५ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

## मौजे परडगाव (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथे विहिरीतील विषारी वायुमुळे दोन शेतक-यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४०) ३४०१४ (२१-०१-२०१६). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे परडगाव (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथे विहिरीतील विषारी वायुमुळे दोन शेतक-यांचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुस-या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मृतांच्या कुटूंबियांना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६)** :(१) दि.११.९.२०१५ रोजी मौ.पाडगाव ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर येथील विहिरीत दोन शेतमजूरांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.

(२) सदर घटनेची ब्रम्हपुरी पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू क्र.४७/२०१५, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १७४ अन्वये नोंद घेऊन तपास करण्यात आला आहे. पाडगाव येथील श्री.रामचंद्र गुरनुले यांच्या शेतात शेतमजूर म्हणून काम करणारे दोन शेतमजूर विहीरीमधील बसवलेली मोटार दुरुस्त करण्याकरीता विहिरीमध्ये उतरले असता विहिरीमध्ये तयार झालेला विषारी वायूमुळे दोन्ही शेतमजूर पाण्यात पडून बुडून मृत्यू झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी शेतमजूरांच्या मृत्यूचे कारण Ashpaxia due to drowning असे दिले आहे.

दोन्ही शेतमजूरांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हुपरी पोलिस ठाण्यातील (जि.कोल्हापूर) दोन हवालदारांना लाच स्वीकारताना पकडल्याबाबत**

**(४१) ३४२०२ (२१-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी पोलिस ठाण्यातील (जि.कोल्हापूर) दोन हवालदारांना लाच स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) तक्रारदार श्री.सुनिल उर्फ गुंड्या किसन चव्हाण, रा.पटणकोडोली, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर यांचेकडून रुपये १,५००/- लाच स्विकारल्या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री.दिपक सावंत यांचेविरुध्द हुपरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३०/२०१५, लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) व १३(२) अन्वये दि.२४.०९.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि.२४.०९.२०१५ अटक करण्यात आली असून त्याच दिवशी आरोपीस जामीन मंजूर झाला आहे. गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून लोकसेवकाविरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री.सावंत यांना दि.२४.०९.२०१५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

अन्य एका प्रकरणी श्री.धनाजी पाटील, पोलीस शिपाई व खाजगी इसम श्री.राजेंद्र गोंगाडे यांचेविरुध्द हुपरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३/२०१६ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, ८, १०, १३(१)(ड) व १३(२) अन्वये दि.२४.०९.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पोलीस शिपाई श्री.पाटील यांना दि.०७.०१.२०१६ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**नाशिक महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयामध्ये सोईसुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(४२) ३४३३१ (२१-०१-२०१६). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत बिटको सह अन्य रुग्णालयात रुग्णांना सोई सुविधा मिळत नसल्याचे माहे आक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयांमध्ये योग्य औषोधोपचार व सोई सुविधा मिळणेबाबत शासनामार्फत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) नाशिक महानगरपालिकेअंतर्गत बिटको रुग्णालयासह अन्य रुग्णालयात वैद्यकीय सोयी-सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(२) महानगरपालिका रुग्णालयात योग्य औषधोपचार व सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानामार्फत मनुष्यबळ व औषधे विनाविलंब पुरविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेडी बंदर (जि.सिधुदुर्ग ) येथील बंदर विकासकास करारातील तरतूदीचे पालन न केल्याबद्दल दिलेल्या नोटिसबाबत**

**(४३) ३४६२४ (२१-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेडी बंदर (जि. सिधुदुर्ग) विकसित करण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि अर्नेस्ट शिपिंग कंपनी यांच्यात करारातील तरतुदीचे पालन न केल्याबद्दल बंदर विकासकास (मे.रेडी पोर्ट लि.) यांना नोटिस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली व त्यानुसार दोषी कंपन्यांचा करार रद्द करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) कंपनीकडून सन २००९ पासून २०१५ पर्यंत हाताळलेल्या मालावर बहुउद्देशिय जेट्टी दराप्रमाणे चढणावळ/उतरणावळ शुल्क लागू करुन रु.२०,०३,३५,४९०/- बंदर बंद कराची थकीत रक्कम रु. २,५१,०५४०८/- अशी एकूण रु.२२,५४,४०,८९८/- इतक्या रकमेचा भरणा करण्याबाबतची नोटीस कंपनीस देण्यात आली होती. त्यावर कंपनीने न्यायालयात दावा दाखल केला असून दि.३०.४.२०१५ रोजी झालेल्या सुनावणी अंती न्यायालयाने अंतिम आदेश जारी केले असून त्याद्वारे कंपनीला मालहाताळणी करण्यापासून प्रतबंध होईल अशी कोणतीही कार्यवाही न करणेबाबत आदेश देण्यात आले आहे. सद्यस्थितीत ही बाब न्यायप्रविष्ठ आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात दारुची तस्करी होत असल्याबाबत**

**(४४) ३५०३१ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी असूनही वाहनावर ऑन गव्हर्नमेंट ड्युटी अशी प्लेट लावून दारुची तस्करी होत असून लोहारा जंगलातून रामनगर पोलिसांनी दिनांक २२ व २७ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास छापे टाकून २१ ड्रम मोहाची दारु पकडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील दारु तस्करी रोखण्याकरिता कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) चंद्रपूर जिल्ह्यात वाहनांवर ऑन गव्हर्नमेंट ड्युटी अशी प्लेट लावून दारुची तस्करी होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, दि.२२/०९/२०१५ व दि.२७/०९/२०१५ रोजीदोन प्रकरणांमध्ये मौजे लोहारा येथे अवैधरित्या मोहाची दारु काढीत असताना आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्यांचेकडून १०० लीटर मापाचे १२ ड्रम व २० लिटर मापाचे १० मडके मोहाची दारु पकडली हे खरे आहे.

(२) शासनाने दि.०१/०४/२०१५ रोजी पासून चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी घोषित केली आहे, दारुबंदी यशस्वीरित्या अंमलबजावणी करिता दारुबंदी मोहिम राबविण्यात येत आहे. अवैध दारु वाहतूक व विक्रीवर आळा घालण्यासाठी प्रत्यक पोलीस स्टेशन पातळीवर तसेच जिल्ह्याचे ठिकाणी स्थानिक गुन्हे शाख, चंद्रपूर येथे भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पथकाद्वारे तसेच इतर पोलीसांनी दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०१/२०१६ पर्यंत एकूण ५६० गुन्हे दाखल करुन ७०४२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये रु.२५,५५,३७,९८८/- किंमतीची ११९६३६ लीटर दारु जप्त करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरी (जि.गोंदिया) येथे अवैध दारु विक्री,सट्टा व जुगार सुरु असल्याबाबत**

**(४५) ३५३८४ (२१-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि.गोंदिया) येथे अवैध दारु विक्रीचे प्रमाण वाढले असून खुलेआम सट्टा व जुगार देखील सुरु असल्याचे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी देवरी पोलीस स्टेशनचे दुर्लक्ष होत असून पोलीस कारवाई करण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) देवरी पोलीस स्टेशन परिसरात अवैध दारु विक्री व जुगाराचे अड्डे निदर्शनास न आल्यामुळे ऑक्टोबर, २०१५ मध्ये एकही गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही. जानेवारी २०१५ ते सप्टेंबर २०१५ या कालावधीत अवैध दारु विक्री संदर्भात १४ गुन्हे व जुगाराबाबत ८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. गुन्हेगारांवर वचक निर्माण झाल्याने ऑक्टोबर २०१५ मध्ये

एकही गुन्हा दघडकीस आला नाही. यापुढेदेखील अवैध दारुविक्री व जुगाराचे धंदे सुरु राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू येथील नियोजित वाढवण बंधाऱ्याला स्थानिक नागरिकांचा होत असलेला तिव्र विरोध**

**(४६) ३५५२६ (२१-०१-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू येथे नियोजित असलेल्या वाढवण बंदराच्या विरोधात डहाणूच्या पश्चिम किनारपट्टीवरील शेतकरी, मच्छीमार, बागायतदार तसेच स्थानिक ग्रामस्थांनी वाढवण बंदरा विरोधात सर्व पक्षीय वाढवण बंदर विरोधी लोकप्रतिनिधी कृती समितीच्या मार्फत अनेकवेळा आंदोलने, मोर्चे काढुन आपला विरोध शासनास निवेदनामार्फत वेळोवेळी कळविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाची सदर बंदरा संबंधात होत असणाऱ्या विरोधाबाबत नेमकी भुमिका काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन शेतकऱ्यांच्या व स्थानिकांच्या हिताच्या दृष्टीने कोणता निर्णय घेणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) बाबत वाढवण येथे जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांचे सॅटेलाईट पोर्ट निर्माण करण्याकरिताचा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांचेमध्ये दि.५/६/२०१५ रोजी परस्पर सामंजस्‍ करार स्वाक्षांकीत करण्यात आला. बंदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

---

**नाशिक शहरातील रस्त्यांचे रुंदीकरणाबाबत**

**(४७) ३५७६५ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील अनेक रस्ते रुंद झाले असले तरी अद्यापही अनेक झाडे वाहतुकीला अडथळा ठरत असून ही झाडे तोडण्यासाठी महापालिकेने उच्च न्यायालयात परवानगी मागितली असता न्यायालयाने मागितलेला वृक्षगणनेचा अहवालच महापालिकेने दोन वर्षापासून सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात अनेक ठिकाणी असलेली झाडे वाहतुकीस अडथळा ठरत असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तातडीने वृक्षगणनेचा अहवाल न्यायालयाला सादर करुन तातडीने रस्ते रुंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६) :**(१) मा.उच्च न्यायालयात दाखल असेलल्या जनहित याचिकेमध्ये नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणारी झाडे तोडण्यास परवानगी देण्यासंदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ९६/२०१४ दाखल केले होते.

सदर सिव्हिल ॲप्लीकेशनच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०८.०५.२०१५ रोजी आदेश पारीत करुन वृक्षतोडीस परवानगी देण्यासंदर्भात विविध अटी घातल्या असून त्यामध्ये वृक्ष गणनेचे काम सुरु करण्याची अट अंतर्भूत आहे. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत वृक्ष गणना करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(२) झाडे तोडण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने वृक्ष गणनेचे काम सुरु करणे, पर्यायी वृक्ष लागवड करणे, काही झाडांचे पुनर्रोपण करणे अशा अटी बंधनकारक केल्याने सदर झाडे तोडता आली नाहीत.

सदर झाडांमध्ये अपघात होऊ नये याकरीता वृक्षांवर एएफपी (ॲल्युमिनीयम बॅक्ड फ्लेक्झीबल प्रिस्मॅटीक) शिट लावले आहेत. तसेच वाहतुक सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्यांमधील झाडांजवळ डेलिनेटर, हजार्ड मार्क, इशारा फलक, सावधान फलक लावलेले आहेत. तसेच आवश्यकतेनुसार काही ठिकाणी ओटे केलेले आहेत.
(३) रस्ते रुंदीकरणासाठी वाहतुकीस अडथळा ठरणारी झाडे तोडणे आवश्यक आहे. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या वृक्षगणना व अन्य अटी/शर्तींची पुर्तता करण्याबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात मद्यधुंद वाहन चालकांमुळे अपघाताचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(४८) ३६३३९ (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मद्यधुंद वाहन चालकांमुळे अपघात होवून दरवर्षी अनेक निअपराध व्यक्तींना आपला जीव गमवावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मद्यधुंद वाहनचालकांचे वाहनाच्या वेगावर नियंत्रण राहत नसल्यामुळे रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) राज्यामध्ये मद्यधुंद वाहनचालकांमुळे सन २०१३ मध्ये २,१८७ अपघातामध्ये ४७९ जणांचा, सन २०१४ मध्ये १,८६५ अपघातामध्ये ४८७ जणांचा तर ऑक्टोबर, २०१५ अखेरपर्यंत ७०९ अपघातांमध्ये २२७ जणांचा मृत्यू झाला आहे.

(२) राज्यामध्ये नाकांबंदी दरम्यान तसेच विशेष मोहिमा राबवून मद्य प्राशन करुन वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा, कलम १८५ अन्वये नियमितपणे कारवाई केली जाते. मद्यप्राशन करुन वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर सन २०१३, २०१४ व ऑक्टोबर, २०१५ अखेर अनुक्रमे ४१,७२७, ५८,४१४ आणि ५३,०४९ एवढ्या केसेस करुन त्यांच्याकडून अनुक्रमे रु.५,३८,०४,०००/-, रु. ६,२४,४२,९०१/- आणि रु.७,५६,७०,१३३/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार मद्यप्राशन करुन वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याकरीता संबंधित प्रादेशिक परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगाव शहरातील फुले आणि गणेश मार्केटमधील इमारती दुरुस्ती करण्याबाबत

**(४९) ३६८६७ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील कंवररात आणि गणेश मार्केटमधील जीर्ण झालेली इमारत, खांबांना ठिकठिकाणी पडलेले तडे, भेगा यामुळे व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फुले मार्केट व गणेश मार्केट या दोन्ही मार्केटची इमारत गेल्या काही वर्षापासून जीर्ण झाल्याने इमारत कधीही कोसळू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे येथील व्यावसायिक, ग्राहक यांच्या मनात नेहमीच भीतीचे वातावरण असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मार्केट इमारती दुरुस्ती करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) जळगाव शहराच्या मध्यवर्ती भागातील सेंट्रल फुले मार्केट व महात्मा फुले मार्केट हे तत्कालीन नगरपालिकेने साधारणत: २५ ते ३० वर्षापूर्वी बांधलेले असून, सुस्थितीत आहेत.

तसेच संत कवरराम मार्केट व गणेश मार्केट हे शहरातील खाजगी मालकीचे मार्केट असून, दोन्ही मार्केट सुस्थितीत आहेत.

प्रत्यक्ष स्थळ पाहणीअंती, या मार्केटचा कोणताही भाग जीर्ण झालेला नाही. तसेच येथील व्यापाऱ्यानादेखील मार्केटबाबत कोणतीही तक्रार केलेली नाही.

(४) सदर मार्केट सुस्थितीत असल्याने, दुरुस्तीबाबत कार्यवाहीची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पवन ऊर्जा कंपन्यांनी प्रकल्पावर देखरेख करण्याकरीता खाजगी स्वरुपात वॉचमन नियुक्त केल्याबाबत**

**(५०) ३६९३१ (१३-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र मोठया प्रमाणात पवन ऊर्जा प्रकल्पांनी आपले प्रकल्प उभारले असून या प्रकल्पावर देखरेख करण्याकरीता वॉचमननांच्या नियुक्ती केल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध पवनऊर्जा प्रकल्प कंपन्यांनी देखरेख करण्याकरीता ठेवलेले वॉचमन यांची नोंद सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाकडे न करता खाजगी स्वरुपात मजुरीवर वॉचमन भरलेले असून या वॉचमनना कामगार मंडळाने ठरवून दिलेला ७५००/- रुपये पगार न देता २०००/- ते २५००/- रुपये पगार देवून वॉचमनची फसवणूक करीत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) नसल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०३-२०१६) :**(१) विविध कंपन्याची पुणे व सातारा जिल्ह्यात पवन ऊर्जा प्रकल्प उभारले असून सदरहू प्रकल्पांवर उभारले असून सदरहू प्रकल्पांवर देखरेखीसाठी खाजगी रक्षक तैनात केले आहेत, हे खरे आहे काय.

(२) पवन ऊर्जा प्रकल्पांवर तैनात केलेला सुरक्षा रक्षक हे खाजगी स्वरुपाचे असल्यामुळे अशा खाजगी सुरक्षा रक्षकांची संबंधित सुरक्षा रक्षक मंडळात नोंद होत नसल्याने त्यामुहे त्यांना मंडळातील नोंदित सुरक्षा रक्षकाप्रमाणे वेतन व भत्ते मिळत नाहीत, हे खरे आहे काय.

(३) होय, संबंधित मंडळाच्या निरीक्षकांनी केलेल्या चौकशीत सदरहू सुरक्षा रक्षकांना किमान वेतना प्रमाणे वेतन मिळत नसल्याचे आढळून आले आहे.

(४) सदरहू आस्थापनांना पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ व सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या निरीक्षकांनी भेटी देवून निरीक्षण शेरे पारीत केले आहेत. तसेच निरीक्षण शेऱ्यांच्या अनुषंगाने या आस्थापनांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचेवर महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियम व कल्याण) अधिनियम, १९८१ व त्याखालील योजनेनुसार मा.न्यायालयात खटले दाखल करण्याची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येत आहे.

दरम्यान दोन्ही सुरक्षा रक्षक मंडळांनी पवन उर्जा प्रकल्पातील खाजगी सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याची नियमानुसार कार्यवाही सुरु केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.